Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(A)| February - 2026

Original Article

# राज्यशास्त्रात कृत्रिम बुद्धिमत्तेची भूमिका: राजकारण, धोरण, निवडणुका आणि लोकशाही

**डॉ. ए.पी. कांबळे**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख, भोगावती महाविद्यालय, कुरुकली
**Email:** apk4197d@gmail.com

**Manuscript ID**:
JRD -2026-180239
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 2(A)
Pp. 194-198
February - 2026
**Submitted:** 18 Jan. 2026
**Revised:** 28 Jan. 2026
**Accepted:** 13 Feb. 2026
**Published:** 28 Feb. 2026

***सारांश***

*कृत्रिम बुद्धिमत्ता (आर्टिफिशियल इंटेलिजन्स) या तंत्रज्ञाने विविध क्षेत्रात क्रांती घडवली आहे .याला राजकीय व्यवस्थेचा ही अपवाद राहिला नाहीत. भारतीय राजकारणातील प्रशासन धोरण निर्मिती, निवडणुका आणि लोकशाहीच्या विविध पैलूंवर या तंत्रज्ञानाचा प्रभाव दिसून येतो आहे. याचा वापर करून प्रशासकीय सुधारणा, निवडणूक प्रक्रिया आणि धोरण निर्मितीमध्ये गतिशीलता वाढवण्याची संधी उपलब्ध होताना दिसते. त्याचबरोबर लोकशाहीचा महत्त्वाचा घटक असणारा मतदार याच्या वर्तनामध्ये सकारात्मक बदल करून घेण्यासाठीसुध्दा याचा वापर करता येऊ शकतो. अलीकडच्या काळात मतदार वर्तन, मतदारांच्या भावना यांचे विश्लेषण करून लोकशाहीतील राजकीय पक्ष मतदार जनजागृती करताना दिसतात. मतदारांच्या आवडीनिवडी विचारात घेऊन तशा पद्धतीच्या आकर्षक घोषणा करण्याची सुरुवात अलीकडे भारतीय राजकारणात झालेली दिसून येते. त्याचबरोबर धोरण निर्मिती व सेवा वितरणाबाबत ही एआय चे अनेक टूल्स वापरून प्रशासनात गतिमानता आणण्याची प्रक्रिया पहावयास मिळते.*

*या तंत्रज्ञानाने भारतीय राज्यकारण विकसित होत असतानाच, त्याच्या वापराबाबतची नैतिकता आणि नियमने तयार करण्याचे आव्हान आपल्या समोर तयार झाले आहे. उपलब्ध असणाऱ्या माहितीची गोपनीयता, अल्गोरिदमचा पूर्वग्रह , राजकीय हेतूसाठी त्याचा गैरवापर अशा अनेक कारणांनी राजकारणामध्ये काही समस्या तयार होताना दिसतात. भारतीय लोकशाहीची प्रतिसादशीलता वाढवण्यासाठी या साधनाचा वापर करताना त्याच्यावर नैतिक बंधने घालणे आवश्यक आहे. त्याबाबत सुस्पष्ट असा कायदा निर्माण होणे गरजेचे आहे. याचा वापर करण्याअगोदर लोकशाही मूल्ये , नागरिकांचे हक्क इत्यादीबाबत एआय वापरासाठीची सुनिश्चित कार्यप्रणाली कायद्याने तयार केली, तरच खऱ्या अर्थाने भारतीय लोकशाही मजबूत होण्यात एआय चा हातभार लागेल असे म्हणता येईल.*

***शोधनिबंधातील मूलभूत शब्द:*** *कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), भारतीय राजकारण, धोरण-निर्मिती , निवडणूक प्रक्रिया आणि लोकशाही, प्रशासन, नैतिक आव्हाने, मतदार ,राजकीय पक्ष.*

**प्रस्तावना**

कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) जागतिक स्तरावर विविध क्षेत्रांमध्ये क्रांती घडवत आहे. भारतीय राजकारणही त्याला अपवाद नाही. त्यामुळे भारतीय राजकारणातील प्रशासन ,धोरण , निवडणुका आणि लोकशाहीच्या अंमलबजावणीवर कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) चा प्रभाव सहाजिक जाणवतो. राजकारणातील एआयचा वापर प्रशासकीय सुधारणा, निवडणूक प्रक्रिया आणि धोरणनिर्मितीची गतिशीलता वाढविण्यासाठी असंख्य संधी प्रदान करू शकतो. एआयचा वापर करून, भारतीय राजकारणातील विविध घटक मतदारांचे वर्तन अधिक चांगल्या प्रकारे समजून घेऊ शकतात, प्रशासकीय कार्ये सुलभ करू शकतात आणि सार्वजनिक सेवांमध्ये लक्षणीय सुधारणा करून , जनताभिमुख धोरणे अंमलात आणू शकतात. अलिकडच्या काळात एआयचा राजकीय क्षेत्रात एक शक्तिशाली साधन म्हणून उदय होत आहे.

*Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)*
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations are licensed under the idential terms.*

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.18937479
OPEN ACCESS

**Address for correspondence:**
*डॉ. ए.पी. कांबळे, राज्यशास्त्र विभाग प्रमुख, भोगावती महाविद्यालय, कुरुकली*

**How to cite this article:**
*कांबळे, . ए . पी . (2026). राज्यशास्त्रात कृत्रिम बुद्धिमत्तेची भूमिका: राजकारण, धोरण, निवडणुका आणि लोकशाही. Journal of Research & Development, 18(2(A)), 194–198.* https://doi.org/10.5281/zenodo.18937479

राजकारणातील एआयच्या अनुप्रयोगांमध्ये सोशल मीडिया विश्लेषण, मतदार भावना विश्लेषण आणि अंदाज बांधणीचे विश्लेषण यांचा समावेश आहे, जे सर्व अधिक प्रभावी प्रचार धोरणे आणि धोरण सूत्रीकरणात योगदान देतात. हा सर्व वापर लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी योग्यप्रकारे वापरणे आवश्यक आहे.

भारतीय राजकीय व्यवस्था खूप गुंतागुंतीची आहे, विविधता असलेली लोकसंख्या, प्रादेशिक भिन्नता, आर्थिक विकासापासून ते सामाजिक न्यायापर्यंतच्या अनेक समस्यांसह भारतीय राजकारण प्रभावित होत असते. मतदारांच्या आवडीनिवडी आणि वर्तनांमध्ये अंतर्दृष्टी प्रदान करून एआय या गुंतागुंतीला तोंड देण्यास मदत करू शकते. यामुळे राजकीय पक्षांना त्यांचे संदेश, धोरणे आणि मतदारांच्या गरजा, आकांक्षांशी चांगल्या प्रकारे जुळवून घेण्यास सक्षम करू शकते. ऑब्झर्व्हर रिसर्च फाउंडेशनच्या एका अभ्यासानुसार, अधिक माहितीपूर्ण आणि प्रतिसादात्मक प्रशासनाला चालना देऊन भारतीय राजकारणात परिवर्तन घडवून आणण्याची क्षमता एआय मध्ये आहे.

या बरोबरच नागरिकांचा राजकीय प्रक्रियेतील सहभाग वाढवणे व सेवा वितरण सुधारण्यासाठी चॅटबॉट्स आणि व्हर्च्युअल असिस्टंट सारख्या एआय-चालित तंत्रज्ञानाचा वापर केला जात आहे. उदाहरणार्थ, २०१९ च्या भारतीय सार्वत्रिक निवडणुकांदरम्यान, राजकीय पक्षांनी मतदारांशी संवाद साधण्यासाठी, त्यांच्या प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी आणि पाठिंबा एकत्रित करण्यासाठी एआय-आधारित साधनांचा वापर केला. यामुळे केवळ मतदारांपर्यंत राजकीय पक्ष पोहचले असे नाही. तर मतदारांच्या गरजा समजून घेऊन त्या भागवण्याची व त्याबाबतचा अभिप्राय मिळवण्याची प्रक्रिया देखील सुव्यवस्थित झाली.

**उद्देश**

१. भारतीय राजकारणातील एआयच्या भूमिकेचे विश्लेषण करणे.
२. मतदार वर्तन व प्रचार धोरणांवरील एआयच्या प्रभावाचे मूल्यांकन करणे.
३. प्रशासन आणि सार्वजनिक सेवा कार्यक्षम व व्यापक बनवण्यातील एआयची भूमिका अभ्यासणे.
४. एआयच्या वापराबाबतची नैतिक आणि नियामक बंधने विश्लेषित करणे.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत शोधनिबंध लेखनासाठी ग्रंथालयीन संशोधन पद्धतीचा उपयोग केला आहे. प्राथमिक व दुय्यम साधनांचा वापर करण्यात आला आहे. प्राथमिक साधने - यामध्ये एआय च्या मुलभूत संकल्पना व त्याचा विस्तार स्पष्ट करणारे प्राथमिक संदर्भ घेतले आहेत. दुय्यम साधने - यात एआय च्या प्रत्यक्ष वापराबाबतच्या अनुषंगाने लिहिलेले लेख, संदर्भ ग्रंथ, मासिके व इंटरनेट इत्यादीचा आधार घेतला आहे. अध्ययनासाठी आवश्यक ती माहिती उपलब्ध करून त्या साधनसामग्रीचे आकलन करून घेऊन, विश्लेषणात्मक व विवेचनात्मक पद्धतीचा वापर करून सदर शोधनिबंधाची मांडणी केली आहे.

एका बाजूला एआयचे तंत्र भारतीय राजकारणात विकसित होत असताना, एआयच्या वापराबाबत नैतिक आणि नियामक आव्हाने देखील निर्माण होत आहेत. महितेची गोपनीयता, अल्गोरिदमिक पूर्वग्रह आणि राजकीय हेतूसाठी एआयचा गैरवापर होण्याची शक्यता याबाबत काळजी घेणे आवश्यक आहे. एआय विकसित होत असताना, धोरणकर्त्यांनी राजकारणात एआयचा नैतिक वापर सुनिश्चित करणारी, लोकशाही मूल्ये आणि नागरिकांच्या हक्कांचे संरक्षण करणारी मजबूत चौकट स्थापित करणे अत्यावश्यक आहे.

आर्टिफिशियल इंटेलिजेंस (एआय) भारतीय राजकारणाची परिणामकारकता आणि प्रतिसादशीलता वाढवण्यासाठी महत्त्वपूर्ण साधन ठरू शकते. एआयच्या शक्तीचा वापर करून, राजकीय नेतृत्व माहितीपूर्ण योग्य निर्णय घेऊ शकतात, मतदारांबरोबर अधिक प्रभावीपणे लोकशाही प्रक्रियेत सहभागी होऊ शकतात. ज्यामुळे लोकशाही प्रक्रिया अधिक गतिमान व न्यायी बनवणे शक्य होईल. या शोधनिबंधात सरकारी धोरण निर्मिती आणि सेवा वितरण ,निवडणूक रणनीती, मतदारांचे वर्तन परिवर्तन आणि प्रचार, प्रशासन आणि सार्वजनिक सेवा कार्यक्षम करणे व राजकारणात एआय च्या वापरात नैतिक आणि नियामक आव्हाने या अनुषंगाने परामर्श घेतला आहे.

**१.सरकारी धोरण निर्मिती आणि सेवा वितरणात एआय ची भूमिका-**

भारताच्या राजकारणात सुध्दा निवडणुका जिंकण्यासाठी आता केवळ भाषणांवर अवलंबून न राहता डेटाचा वापर केला जातो आहे. मतदारांच्या वर्तनाचे निरीक्षण करताना, एआय च्या माध्येमातून मतदारांच्या आवडीनिवडी, सोशल मीडियावरील कल आणि त्यांच्या समस्यांचे विश्लेषण केले जाते. या प्रक्रियेमुळे प्रत्येक मतदाराच्या मानसिकतेनुसार त्याला कोणते मुद्दे पटतील, याचे विश्लेषण करून तशाच प्रकारचे राजकीय संदेश पाठवले जातात. ज्यामुळे प्रचाराची परिणामकारकता वाढते.

लोकशाही राजकीय व्यवस्थेत सामान्य नागरिक आणि शासन यांच्यातील अंतर कमी होऊन परस्पर अधिमान्यता दृढ करणे गरजेचे असते. यामध्ये एआय चॅटबॉट्सद्वारे नागरिक २४/७ तक्रारी नोंदवू शकतात, तसेच शासकीय धोरणांवर आपली मते मांडू शकतात. भविष्यात लोकशाही देशांमध्ये सरकार कोणते निर्णय घेणार आहे व त्या निर्णयाबाबत नागरिकांचे मत काय आहे. हे एआय प्लॅटफॉर्मद्वारे मतदान घेऊन समजून घेता येईल. आताच ई-गव्हर्नन्स प्रणालीमुळे नागरिक सहभागात ३०% ते ४०% ने वाढ झाल्याचे

दिसून आले आहे. सहाजिकच एआय मुळे सामान्य नागरिक आणि शासन यांच्यातील अंतर कमी झाले आहे किंवा ते कमी करण्यात एआय मुळे यश येत आहे. हे लोकशाहीच्या सदृढतेसाठी आवश्यक व महत्त्वपूर्णबाब ठरते.

लोकशाही राजकीय व्यवस्थेचे यश हे अनेक पर्यायातून एक योग्य पर्याय माहितीपूर्ण रित्या निवडण्याच्या पद्धतीवर अवलंबून असते. पण एआय च्या वापरामुळे ही 'माहितीपूर्ण निवडीवर' (Informed Choice) काही गंभीर अडथळे निर्माण केले जातात.

सोशल मीडियावरील एआय अल्गोरिदम नागरिकांना तीच माहिती दाखवतात जी त्यांना आवडते. याला फिल्टर बबल्स (Filter Bubbles) असे म्हणतात. यामुळे समाजात वैचारिक ध्रुवीकरण (Ideological Polarization) वाढते. एका विचारला प्रतिकार करणारा दुसरा विचार असतो. अशा दोन्ही बाजू नागरिकांना समजल्या तरच ते सदसदविवेकबुद्धीने योग्य निर्णय घेणारे सुजान नागरिक निर्माणाच्या प्रक्रियेला चालना मिळत असते. पण एआय अल्गोरिदम त्या व्यक्तीला आवडणारीच माहिती सातत्याने दाखवतो. पर्यायाने त्या व्यक्तीला आपलीच भूमिका सत्य वाटण्यास सुरुवात होते.

२०२४ मध्ये जगभरातील ६० हून अधिक देशांमध्ये राजकीय पक्षांनी जनमतावर प्रभाव पाडण्यासाठी एआय बॉट्सचा वापर केला आहे. मतदारांच्या निर्णय प्रक्रियेत गोंधळ निर्माण करण्यासाठी डीपफेक ऑडिओ आणि व्हिडिओंचा वापर आता लोकशाहीसमोरील सर्वात मोठा धोका बनला आहे.

### २.निवडणूक रणनीती, मतदारांचे वर्तन परिवर्तन आणि प्रचार करण्यासाठी वापरले जाणारे एआय

राजकारणात 'नॅरेटिव्ह' सेट करण्यासाठी एआयचा वापर केला जातो आहे. सकारात्मक आणि नकारात्मक असे दोन्ही प्रकारचे 'नॅरेटिव्ह' समाज मनात भरवण्याचे काम एआय करताना दिसते.लोक सरकारबद्दल किंवा एखाद्या राजकीय नेत्याबद्दल काय विचार करतात, हे रिअल-टाइममध्ये समजून घेण्यासाठी एआय चा वापर करून सेंटिमेंट एनालिसिस केले जाते. राजकीय पक्षांकडून स्वयंचलित 'बोट्स'चा वापर करून सोशल मीडियावर विशिष्ट हॅशटॅग ट्रेंड केले जातात, ज्यामुळे जनमतावर प्रभाव पडतो. यासाठी बोट्स आणि अल्गोरिदम या एआय टूल्सचा वापर केला जातो.

निवडणुकीच्या क्षेत्रात प्रचार, सर्वेक्षण, निर्णय प्रक्रिया आणि संवाद घडवण्यासाठी पारंपरिक पद्धतीने घरोघरी जाऊन पत्रके वाटणे, प्रत्यक्ष मुलाखती आणि नमुने, नेत्यांचा अनुभव ,ज्ञान व भाषणे अशा साधनांचा वापर केला जात होता.

आता एआय च्या वापरानंतर सोशल मीडियाद्वारे वैयक्तिकृत जाहिराती, रिअल-टाइम डेटा आणि सेंटीमेंट अनालिसिस, डेटा आणि सांख्यिकीय पुराव्यांवर आधारित निर्णय प्रक्रिया व चॅटबॉट्सद्वारे मतदारांशी थेट संवाद अशा आधुनिक साधनांचा वापर सुरु झाला आहे.

आधुनिक प्रगत एआय अल्गोरिदमचा वापर करून मतदारांचे ५,००० हून अधिक डेटा पॉइंट्स (उदा. वय, उत्पन्न,शिक्षण , शेती, आवड,भविष्यातील नियोजन , इंटरनेट सर्च हिस्ट्री, खरेदीच्या सवयी इ.) तपासले जातात. या माहितीच्या आधारावर मतदारांच्या आवडीच्या योजना व घोषणा तयार करण्यावर सर्वच राजकीय पक्षांचा भर दिसतो. केंब्रिज ॲनालिटिका प्रकरणापासून हे सिद्ध झाले आहे की, केवळ १-२% 'स्विंग वोटर्स' (झोपाळयावरचे मतदार) यांच्या मनात बदल घडवून आणल्यास निवडणुकीचा निकाल पूर्णपणे बदलू शकतो. आधुनिक प्रगत एआय अल्गोरिदमचा वापर यात ९०% पेक्षा जास्त अचूकता देऊ शकते. पर्यायाने सर्वच राजकीय पक्ष कमी-अधिक प्रमाणात याचा वापर करून मतदारांना वास्तव परिस्थितीपासून अलिप्त ठेऊन आपणास पाहिजे तसा निवडणूक निकाल येण्यासाठी याचा गैरवापर सुध्दा करू शकतात.

निवडणूक हि लोकशाहीची सर्वात मोठी व अधिमान्यतेची प्रक्रिया आहे, या प्रक्रियेत मतदार नोंदणी, मतदान केंद्रांचे नियोजन, मतदार याद्या आध्यावत करणे, मतदान प्रक्रियेत सुलभता आणणे यासाठी एआय चा वापर होत आहे. मतदार नोंदणीतील दुबार नावे वगळणे आणि मतदार यादीतील त्रुटी दूर करणे एआय मुळे सोपे झाले आहे. 'प्रेडिक्टिव्ह ॲनालिटिक्स' वापरून कोणत्या केंद्रावर जास्त गर्दी होईल किंवा कुठे तणाव निर्माण होऊ शकतो, याचा अंदाज प्रशासन आधीच घेऊ शकते. पर्यायाने मतदान केंद्रांचे नियोजन करणे सोपे होते. २०२४ च्या निवडणुकांमध्ये भारतासह अनेक देशांमध्ये ई-व्होटिंग आणि मतदार पडताळणीत एआय मुळे मानवी चुकांचे प्रमाण ९५% ने कमी झाले आहे.

### ३. प्रशासन आणि सार्वजनिक सेवा कार्यक्षम करण्यात एआयची भूमिका

प्रशासन आणि सार्वजनिक सेवांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता एआय चा वापर करणे म्हणजे केवळ 'टेक्नॉलॉजी' वापरणे इतकेच मर्यादित नाही. तर सरकारी कामामध्ये गतिशीलता आणून सरकारी कार्यालयांचा चेहरामोहरा बदलणे समाविष्ट आहे. पूर्वी ज्या कामांसाठी सरकारी कचेऱ्यांमध्ये सातत्याने चकरा माराव्या लागायच्या, ती कामे आता एका 'क्लिक'वर आणि अधिक पारदर्शकपणे करणे एआय मुळे शक्य झाले आहे.

प्रशासकीय सुधारणांमध्ये एआय क्रांती घडवून आणत आहे, प्रशासनात कार्यक्षमता आणि वेगवान सेवा निर्माण करण्यात सर्वात मोठी अडचण असते, ती म्हणजे फाईल्सचा ढीग आणि त्याचा निपटारा होण्यासाठी लागणारा विलंब. पण एआय या प्रक्रियेला गती देताना दिसते. अर्ज तपासणे, डेटा एन्ट्री करणे आणि कागदपत्रांची पडताळणी करणे यांसारखी कंटाळवाणी कामे एआय वेगाने करू शकते. तसेच हि कामे स्वयंचलित प्रक्रिया (Automation) द्वारे चालतात त्यामुळे मनुष्य बळाच्या कमी वापरात हि दिरंगाई निर्माण

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(A)| February - 2026

करणाऱ्या कामांचा वेळेत निपटारा करणे शक्य झाले आहे. तसेच चॅटबॉट्स (Chabot's) आणि व्हर्च्युअल असिस्टंटच्या माध्यमातून नागरिक कधीही आपल्या शंकांचे निरसन करू शकतात. यासाठी सरकारी कर्मचाऱ्याची वाट पाहण्याची गरज उरत नाही. सरकारी प्रशासनासाठी या सेवा २४/७ तास उपलब्ध झाल्या आहेत.

सरकारला जेव्हा एखादी नवीन योजना आखायची असते, तेव्हा एआय उपलब्ध डेटाचे विश्लेषण करून ती योजना किती यशस्वी होईल याचा अंदाज देऊ शकते. ती योजना सुलभ करण्यासाठी उपाय सुचवू शकते. त्या योजनेच्या परिणामकारकतेचा अंदाज देऊ शकते. यामुळे जनतेचा पैसा वाया जाण्याचे प्रमाण कमी होते. पर्यायाने योग्य धोरणांची निर्मिती चांगल्या पद्धतीने करण्यास एआय चा सहभाग खूप महत्त्वाचा व आवश्यक ठरतो आहे.

एआय मुळे प्रशासनातील मानवी हस्तक्षेप कमी होतो व सिस्टीम स्वतःहून निर्णय घेते, तेव्हा प्रशासनातील वशिलेबाजी किंवा भ्रष्टाचाराला कमी वाव मिळतो. उदा. थेट लाभ हस्तांतरण (DBT) मध्ये एआय चा वापर करून योग्य लाभार्थ्यांची निवड करणे सोपे जाते.

सार्वजनिक सेवांमधील एआय मुळे महत्त्वाचे बदल झाले आहेत. आधुनिक काळात एआय च्या मदतीने रोगांचा प्रादुर्भाव ओळखणे, विद्यार्थ्यांच्या प्रगतीचे विश्लेषण करणे, हवामान आणि पिकांचा अंदाज, गुन्हेगारीचा अंदाज (Predictive Policing) अशा अनेक बाबींचा अंदाज घेऊन, साथीचे रोग वेळीच रोखता येणे, विद्यार्थ्यांच्या प्रगतीकडे वैयक्तिक लक्ष देणे, हवामान व पिकांबाबत शेतकऱ्यांना अचूक माहिती देणे , गुन्हे घडण्यापूर्वीच त्याबाबत प्रतिबंधात्मक उपाययोजना करता येऊ शकते. त्यामुळे सामाजिक , राजकीय,आर्थिक, आरोग्य व व्यक्तीच्या सर्वांगीण विकासाचे प्रारूप बनवणे सोयीचे झाले आहे.

प्रशासनामध्ये ज्या देशांनी सरकारी कंत्राटांच्या वाटपात एआय चा वापर केला आहे, तिथे पारदर्शकतेत १५-२०% वाढ झाल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे आपोआप भ्रष्टाचाराला आळा बसण्यास मदत झाली आहे. तसेच एआय आधारित तक्रार निवारण 'Grievance Redressal' प्रणालीमुळे जनतेच्या तक्रारी सोडवण्याचा वेग ५ पटीने वाढला आहे.

**एआय हे प्रशासनासाठी एक अत्यंत प्रभावी 'साधन' आहे. जर याचा वापर जबाबदारीने आणि नैतिकतेने केला, तर "किमान सरकार, कमाल शासन" (Minimum Government, Maximum Governance) हि बाब प्रत्यक्षात येऊ शकते.**

**४. राजकारणात एआय च्या वापरात नैतिक आणि नियामक आव्हाने**

एआय चा राजकारणातील प्रवेश हा लोकशाही रुजवण्यासाठी चांगला आहे असे मत मांडले जात असले, तरी लोकशाही समोर काही गंभीर आव्हानेही उभी झाली आहेत.

राजकीय नेत्यांचे बनावट व्हिडिओ किंवा ऑडिओ क्लिप्स तयार करून मतदारांची दिशाभूल केली जाऊ शकते. यामुळे निवडणुकीच्या काळात अफवांचे पीक येते. एआय मुळे डीपफेक्स (Deepfakes) मोठ्याप्रमाणात तयार होताना दिसतात. मतदारांच्या खाजगी माहितीचा (Data Privacy) राजकीय फायद्यासाठी गैरवापर होण्याचा धोका असतो. जर एआय ला दिलेला डेटा पूर्वग्रहदूषित असेल, तर त्याचे येणारे निष्कर्षही एखाद्या विशिष्ट समाजाच्या किंवा विचारांच्या विरोधात असू शकतात.

सध्या जगातील केवळ १५% ते २०% देशांकडे राजकारणातील एआय वापरण्याबाबत ठोस कायदे आहेत. उर्वरित जगाकडे तसे कायदे नाहीत. जगातील पहिला मोठा प्रयत्न युरोपियन युनियन (EU AI Act) ने केला आहे. जो कायदा राजकीय हेतूंसाठी उच्च-जोखमीच्या एआय साधनांच्या वापरावर निर्बंध घालतो. भारतात निवडणूक आयोगाने 'डीपफेक' विरोधात मार्गदर्शक तत्त्वे जारी केली असली, तरी अद्याप स्वतंत्र कायदा अस्तित्वात नाही. ही भारताची एआय वापराबाबतची सध्यस्थिती आहे.

एआय वापराबाबत काही आव्हानेही आहेत, ज्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. नागरिकांचा डेटा सुरक्षित ठेवणे हे मोठे आव्हान आहे. त्याची गोपनीयता राखणे आज जोखमीचे झाले आहे. तर दुसऱ्या बाजूला ज्या नागरिकांच्याकडे इंटरनेट किंवा स्मार्टफोन नाही, अशा लोकांपर्यंत वेगवेगळया सेवा कशा पोहोचवायच्या हा प्रश्न निर्माण होतो आहे. तसेच सर्व शासकीय व प्रशासकीय निर्णय केवळ डेटावर घेणे योग्य नाही. कारण काही निर्णय मानवी संवेदना व सहानुभूतीपूर्वक घ्यावे लागतात, जे एआय ला अद्याप शक्य झालेले दिसून येत नाही.

**निष्कर्ष**

आधुनिक राज्यशास्त्राच्या अभ्यासात एआय आता एक अपरिहार्य घटक बनला आहे. त्यामुळे लोकशाही अधिक सक्षम करण्यासाठी याचा वापर करणे हे सुद्धा अपरिहार्य बनले आहे. परंतु त्याच्या वापराबाबत नैतिक नियमावली (Ethical Regulation) नसल्यास हे तंत्रज्ञान लोकशाहीसाठी घातकही ठरू शकते. भविष्यात 'डिजिटल लोकशाही' टिकवून ठेवण्यासाठी एआय वर मानवी नियंत्रण आणि पारदर्शकता असणे अत्यंत आवश्यक आहे. अन्यता राज्यशास्त्रात एआय हे एक 'दुधारी शस्त्र ' बनेल. जिथे एआय प्रशासकीय कार्यक्षमता वाढवते, तिथेच ते माहितीच्या अधिकारावर आणि नि:पक्षपाती निवडणुकांवर गदा आणू शकते. संशोधनाचा कल असा सांगतो की, आगामी दशकात राजकारण हे 'ज्याकडे प्रगत अल्गोरिदम, त्याची सत्ता' या सूत्रावर चालेल. लोकशाहीत एआय ची

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(A)| February - 2026

भूमिका ही 'साधन' म्हणून महत्त्वाची आहे, पण ती 'साध्य' बनता कामा नये. जर आपण एआय वर मानवी नियंत्रण आणि कायदेशीर निर्बंध ठेवले, तर ते लोकशाहीला अधिक प्रगल्भ करू शकते. मात्र, त्याचा अनिर्बंध वापर लोकशाहीला 'झुंडशाही 'कडे (Mobocracy) नेण्याची भीती नाकारता येत नाही.

**संदर्भ**


1. 'माहितीचे मार्ग', के.टी. पावटे अनुवाद- वैशाली जोशी, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे. प्रथम आवृत्ती सप्टेंबर, १९९६.
2. 'इंटरनेट वापरातील धोके टाळण्यासाठी', अतुल कहाते, रोहन प्रकाशन, वीर मारुतीसमोर, पुणे. पहिली आवृत्ती डिसेंबर,२०१४.
3. 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स', अच्युत गोडबोले, मधुश्री पब्लिकेशन, नारायण पेठ, पुणे. प्रथम आवृत्ती ५ सप्टेंबर, २०२१.
4. 'इन्फोटेक', अच्युत गोडबोले ,मधुश्री पब्लिकेशन, नारायण पेठ, पुणे. दुसरी मराठी आवृत्ती डिसेंबर,२०२१.
5. 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स', डॉ. गिरीश वालावलकर, मायमिरर पब्लिशिंग हाऊस प्रा. लि., पुणे. प्रथम आवृत्ती ऑगस्ट, २०२४.
6. Sharma, V. Ethical Challenges of AI in Politics. Indian Journal of Ethics in AI. (2021).
7. Singh, P. AI in Indian Elections: Transforming Voter Engagement. Election Studies Journal. (2020).
8. https://www.nbr.org/publication/ai-governance-in-india/
9. https://www.mdpi.com/2813-5288/2/4/20